गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी
शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती-२०१८/प्र.क्र.११८/शिक्षण**
**मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.**
**दिनांक: ११ ऑक्टोबर, २०१८**

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र. ईबीसी-२००३/प्र.क्र.११५/मावक-२, दि.११ जून, २००३
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.ईबीसी-२०१७ / प्र.क्र.२८८/शिक्षण-१, दि.२७ जून, २०१७
३) शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र.आदिशि-१२०३ /प्र.क्र.७६ / कार्या-१२, दि. ३१ मार्च,२००५
४) शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र.पशिशि-२०१५ /प्र.क्र.३३४ / कार्या-१२, दि.१६ मार्च,२००६
५) मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २१ ऑगस्ट,२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**<u>प्रस्तावना :-</u>**

अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागातर्फे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. तथापि, सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी नसल्यामुळे, आर्थिक परिस्थितीमुळे सदर प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशातील नामांकित शिक्षण विद्यापीठामधील उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. सदर बाब विचारात घेऊन, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्याबाबतचा निर्णय मा.मंत्रिमंडळाने दिनांक २१ ऑगस्ट,२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतला आहे. मा. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन याबाबत सविस्तर आदेश निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय : -</u>**

महाराष्ट्र राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE(Times Higher Education)/ किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील, अशा विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील एकत्रितपणे १० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. ही योजना विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे" या नावाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून राबविण्यात यावी.

३. या योजनेची व्याप्ती पुढीलप्रमाणे राहिल :-

सदर योजना विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्याकरिता लागू राहील. ज्या मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना अशा स्वरूपाची परदेशी शिष्यवृत्ती लागू केली आहे अशा मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी त्या-त्या प्रशासनिक विभागाच्या योजनेमध्ये अर्ज करणे अपेक्षित आहे. विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

४. शिष्यवृत्तीची शाखा निहाय विभागणी :-

सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा निहाय मर्यादा प्रत्येक वर्षासाठी निश्चित करण्यात येत आहे -

| **अ.क्र.** | **शाखा / अभ्यासक्रम** | **पदव्युत्तर पदवी/पदविका, डॉक्टरेट** |
|---|---|---|
| १. | कला | ०१ |
| २. | वाणिज्य | ०१ |
| ३. | विज्ञान | ०१ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ |
| ५. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | ०४ |
| ६. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ |
| | **एकूण** | १० |

५. शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३०% जागांवर मुलींची निवड करण्यात येईल.

६. या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी प्रवेश संख्या निर्धारीत केलेली असून त्या मर्यादेत विद्यार्थ्याची निवड करण्यात येईल.

७. या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता/अपात्रता , मिळणारे लाभ , शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादीची माहिती सोबतच्या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

८. या योजनेसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रुपये १०.०० कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागास स्वतंत्ररित्या मंजूर करण्यात येणार आहे. तसेच या योजनेसाठी टप्प्याटप्प्याने होणाऱ्या आवर्ती खर्चाचा जास्तीत जास्त रुपये ४०.०० कोटी इतका आर्थिक भार शासनाने मान्य केला आहे. या योजनेसाठी नविन लेखाशीर्ष उघडण्याची व आवश्यक तरतूद करण्याची कार्यवाही स्वतंत्ररित्या करण्यात येत आहे. दरम्यान या योजनेसाठी जाहिरात देणे, ऑन-लाईन ॲप्लीकेशन तयार करणे, कंत्राटीतत्वावर आवश्यक त्या नियुक्त्या इत्यादीवर होणारा खर्च संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय यांच्या स्वीय प्रपंजी लेख्यातून करण्यात यावा.

९. शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून ही योजना महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून राबविण्यात यावी.

१०. सदर शासन निर्णय, मा.मंत्रिमंडळाने दिनांक २१ ऑगस्ट,२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८१०१२१८१५३०५१२२ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: CN = Bhaurao Raghunath Gavit, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = VJNT OBCS SBC Welfare Dept.
Date: 2018.10.12 18:18:28 +05'30'

**( भा.र. गावित )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

सोबत-वरीलप्रमाणे

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री, (विजाभज) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री, (विजाभज) यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१०. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१२. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
१६. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२०. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२२. कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
२३. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२४. सर्व जिल्हाधिकारी
२५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
२६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, क्रमांक : शिवृत्ती-२०१८/प्र.क्र.११८/शिक्षण,

दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ सोबतचे

**परिशिष्ट-अ**

परदेशी शिष्यवृत्तीकरीता मंजूर करण्यात येणारे अभ्यासक्रम

| **Engineering/ Architecure** | **Management** | **Science** | **Arts & Commerce** | **Law** | **Pharamcy** |
|---|---|---|---|---|---|
| *Permissible Courses :- P.G./P.G. Diploma/Ph.D. | *Permissible Courses :- P.G./P.G.Diploma | *Permissible Courses :- P.G./ Ph.D | *Permissible Courses :- P.G. / Ph.D | *Permissible P.G. / Ph.D | *Permissible P.G. / Ph.D |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1.Civil | 1. M.B.A. with Finance/Marketing/ H.R./SystemAnalysis | 1. Agriculture | 1. Sociology | L.L.M | M.Pharm |
| 2.Mechanical | 2. Hotel Management | 2. Horticulture | 2. Psychology | | |
| 3. Electrical | | 3. Animal Husbandary | 3. Philosophy | | |
| 4. Chemical | | 4. General Science | 4. Economics | | |
| 5. Computer | | 5. Maths. | 5. Commerce | | |
| 6. Production | | 6. Science | | | |
| 7. Industrial Engg. | | 7. Physics | | | |
| 8. Environmental Engineering | | 8. Chemistry | | | |
| 9. Mining Engg. | | 9. Botany | | | |
| 10. Petrochemical | | 10. Zoology | | | |
| 11. Electronic & TC | | | | | |
| 12. Information Technology/ Information System/ Informat ion Science/Computer Engineering | | | | | |
| 13. Bio-Technology | | | | | |
| 14. Genetic Engineering | | | | | |
| 15. Nano Technology | | | | | |
| 16. Industry Internet of Things (IIOT) | | | | | |
| 17. Cyber Law/Cyber Security | | | | | |
| 18. Biomedical Engg. | | | | | |
| 19. Climate Change | | | | | |
| 20. Artificial Intelligence | | | | | |
| 21. Architecture | | | | | |
| Eligibility | | | | | |
| Graduation for P.G. & Post Graduation for Ph.D. | Graduation in any subject for MBA Graduation in Hotel Management | Post Graduation in Concerned Subject | Graduation/Post Graduation in Concerned Subject | Graduation / P.G. in Law | Graduation / P.G. in Pharmacy |

* Note:-

१) Only accredited Universities/Institutions of Foreign Countries will only be considered.

२) वरील अभ्यासक्रम हे निर्देशनात्मक असून विद्यार्थ्यांने परदेशी विद्यापीठामध्ये प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचा समावेश कोणत्या शाखेकरीता करावयाचा याचा निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीस राहतील.

शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, क्रमांक : शिवृत्ती-२०१८/प्र.क्र.११८/शिक्षण, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ सोबतचे

**परिशिष्ट-ब**

१. सर्वसाधारण अटी व शर्ती :-

१) विद्यार्थी व विद्यार्थ्याचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.

२) विद्यार्थ्याला परदेशातील THE/QS अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींगमध्ये २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था / विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळालेला असावा.

३) विद्यार्थ्यांने पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना पदव्युत्तरसाठी किंवा पीएचडी अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना, पीएचडीसाठी यापुर्वी इतर कोणत्याही राज्य शासनाची अथवा केंद्रशासनाची परदेशी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी. तसेच त्यांने अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज केलेला नसावा.

४) परदेशातील विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा.

५) एक्झेक्युटीव्ह पदव्युत्तर पदवी किंवा एक्झेक्युटीव्ह पदव्युत्तर पदविका व अर्धवेळ अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असणार नाहीत.

६) प्रवेशित अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेल्या विहीत कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मान्य केली जाणार नाही.

७) सदर योजना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालय व उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण घेण्याकरिता लागू राहील.

२. वयोमर्यादा :-

पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थीच्या वयाची कमाल ३५ वर्ष आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी लाभार्थीच्या वयाची ४० वर्ष वयोमर्यादा असावी.

३. उत्पन्न मर्यादा :-

१. या योजनेखाली लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुबांचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील वार्षिक उत्पन्न रुपये ०८.०० लाखापेक्षा जास्त नसावे.

२. विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म न. १६ व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदारपेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागिल आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४. शैक्षणिक अर्हता :-

अ) परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किंमान ६०% गुणांसहित पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

ब) पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किंमान ६०% गुणांसहित पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

क) हा पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम त्याने अर्जाच्या दिनांकाला उत्तीर्ण केलेला असावा.

५. अभ्यासक्रमाचा कालावधी :-

१) पीएचडी- ४ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी या पेक्षा जो कमी असेल तो.

२) पदव्युत्तर पदवी- २ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल तो.

३) पदव्युत्तर पदविका- १ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल तो.

**६. एकाच कुटुंबातील कमाल पात्रताधारक :-**

१) सदर योजनेचा लाभ एकाच कुटुंबातील एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल.

२) एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त मुलांनाही शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करुन देणे बंधनकारक असेल.

३) सदरची शिष्यवृत्ती एकाच वेळेस मान्य करण्यात येईल. एकापेक्षा जास्त वेळेस विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही.

**७. अर्ज करण्यासाठी अनिवार्य अटी :-**

१) नोकरीमध्ये असलेल्या उमेदवारांनी तो जेथे नोकरी करतो त्या यंत्रणेचे (organization Employer) ना-हरकत प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य आहे.

२) पात्र विद्यार्थ्याने Non Judicial Stamp Paper वर Public Notary समोर विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र लिहून देणे बंधनकारक असेल.

३) विद्यार्थ्याने दोन जामीनदार देणे बंधनकारक असेल. या प्रत्येक जामीनदाराने स्वतंत्र Surety Bond करुन देणे बंधनकारक असेल.

४) अर्ज करणा-या विद्यार्थ्याचे स्वास्थ्य चांगले असले पाहीजे. त्याकरिता त्याने नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

५) विद्यार्थी शिक्षणासाठी आवश्यक असलेला कालावधी किंवा शिक्षण त्यापूर्वी पुर्ण झाल्यास जो कालावधी लागेल या दोघांपैकी जो कमी आहे त्या कालावधी पुरतेच परदेशात राहण्याचे बंधपत्र (Bond) राज्य शासनास तसेच परदेशातील भारतीय दूतावासास लिहून द्यावे लागेल. या आवश्यक कालावधीपेक्षा जास्त कालवधीकरीता परदेशात राहण्यास विद्यार्थ्यांस परवानगी मिळणार नाही.

६) विद्यार्थ्यास शासनाने विहीत करुन दिलेल्या नमुन्यात Record Release Consent Form हा बंधपत्राच्या स्वरुपात द्यावा लागेल.

७) विद्यार्थ्यांस परदेशामध्ये प्रवेश मिळण्यासाठी THE/किंवा QS World Ranking मधील २०० च्या आतील अद्ययावत जागतिक क्रमवारीत असलेल्या विद्यापीठ/शिक्षणसंस्था मध्ये प्रवेशासाठी स्वत: प्रयत्न करावा लागेल व त्यासाठी आवश्यक त्या सर्व पात्रता परीक्षा देणे बंधनकारक असेल.

८) ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्थांकडून Unconditional Offer Letter मिळालेले असेल, त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील, यासाठी Conditional Offer Letter गृहीत धरले जाणार नाही.

९) विवाहीत उमेदवाराच्या पत्नी व मुले यांना परदेशामध्ये सोबत घेवून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे सहाय्य दिले जाणार नाही. त्यासाठी पासपोर्ट मिळविणे, व्हिसा मिळविणे, आर्थिक तरतुद करणे, परदेशातील निवास व दैनंदिन खर्चाची व्यवस्था करणेही उमेदवाराची वैयक्तिक जबाबदारी असेल.

१०) नोकरी करणाऱ्या उमेदवारांनी सर्व प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वत: प्रत्यक्षपणे निराकरीत करावयाच्या आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून मिळणार नाही.

११) (अ) अचानक उध्दवलेल्या परिस्थितीमध्ये, परदेशामध्ये शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यास भारतामध्ये यावयाचे असल्यास त्यासाठी त्याचे संबंधित शैक्षणिक संस्था आणि संबंधीत शिक्षण संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल आणि याबाबतची माहिती संबंधित विद्यार्थी भारतीय दूतावासास कळवतील.

(ब) जेवढया कालावधीमध्ये परदेशातील शैक्षणिक संस्थेमधून दूर असेल, तेवढया कालावधीचा कोणताही खर्च त्यास अनुज्ञेय होणार नाही. तथापि, तो पुन्हा त्याच शैक्षणिक संस्थेत त्याच अभ्यासक्रमाचे पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी हजर झालेल्या दिवसापासून त्यास देय लाभ अनुज्ञेय होतील.

(क) अशा परिस्थितीत विद्यार्थ्याने परत त्याच परदेशी शिक्षण संस्थेमध्ये हजर न होता शिक्षण अर्धवट सोडल्यास त्यास अदा करण्यात आलेले शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क इतर शुल्क व निर्वाहभत्त्याची व्याजासह वसूली करण्यात येईल, याबाबतचे लेखी **हमीपत्र** विद्यार्थ्यास द्यावे लागेल.

१२) पासपोर्ट व व्हिसा मिळविण्याची जबाबदारी उमेदवार/विद्यार्थ्याची असेल,

१३) उमेदवारास/विद्यार्थ्यांना केवळ ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये, ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेला आहे व शिष्यवृत्ती मिळाली आहे त्याच कारणासाठी व्हिसा घेणे बंधनकारक असेल.

१४) निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी मागणी केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे व आवश्यक ते करारनामे देणे बंधनकारक असेल.

१५) निवड झालेल्या विद्यार्थ्यास त्याच्या शैक्षणिक कालावधीमध्ये जास्तीची रक्कम अदा झाली असल्यास त्याची परतफेड करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल. अथवा ती वसूल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक असेल.

१६) सदर शिष्यवृत्तीबाबत महाराष्ट्र शासनाच्या विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

१७) परदेशी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती देण्याकरिता एक स्वतंत्र स्वीय प्रपंजी लेखा (PLA) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडे उघडण्यात येईल. त्यामध्ये समाजातील दानशूर व्यक्ती तसेच या योजनेचा लाभ घेऊन नोकरी/व्यवसाय करणा-या विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारी रक्कम जमा करण्यात येईल. या निधिचा उपयोग केवळ परदेशी शिष्यवृत्तीसाठी करण्यात येईल.

१८) विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर जेव्हा त्यांना नोकरी मिळेल, किंवा तो स्वत:च्या व्यवसाय सुरु करेल किंवा अभ्यासक्रम पूर्ण केल्यापासून दोन वर्षानंतर यापैकी कमी असलेल्या कालावधीपासून त्याच्या शिक्षणासाठी शासनामार्फत जो खर्च करण्यात आला आहे, त्याखर्चाच्या साधारण १०% रक्कम महाराष्ट्र शासनाच्या यासाठी उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये जमा करावी लागेल. जेवढी रक्कम विद्यार्थी जमा करतील तेवढीच रक्कम महाराष्ट्र शासन निधी मध्ये जमा करील व त्याचा विनियोग याच प्रयोजनासाठी करण्यात येईल.

१९) या शिष्यवृत्तीचा लाभ घेवून पूर्ण करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचा लाभ राज्य शासनास होणे या योजनेमध्ये अपेक्षित आहे. त्यामुळे ज्या शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांने महाराष्ट्र राज्यात परत येवून त्याचा अभ्यासक्रमाचा लाभ राज्यास होईल याकरीता आवश्यकतेनुसार राज्य शासनास सेवा देणे अपेक्षित आहे. त्याबाबतचे बंधपत्र लाभार्थी विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावे.

**८. विद्यार्थ्यास मिळणारे लाभ:-**

परदेशी शिष्यवृती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यास खालील लाभ देण्यात येतील.

१) परदेशातील शैक्षणिक संस्थेने पत्रामध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी ही संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे किवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत थेट संबधित शैक्षणिक संस्थेस अदा करण्यात येईल.

२) प्रवेश घेतलेल्या संबंधित शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेल्या अथवा भारत सरकारच्या DOPT विभागाने विदेशी शिष्यवृत्तीसाठी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे येणारा खर्च अथवा महाराष्ट्र शासन वेळोवेळी या प्रयोजनासाठी जाहीर करेल ती रक्कम ही निर्वाह भत्ता म्हणून संबंधित विद्यार्थ्याच्या परदेशातील वैयक्तीक खात्यामध्ये जमा केला जाईल.

३) विद्यार्थ्यास परदेशी शिक्षण संस्थेमार्फत किंवा इतर कोणत्याही यंत्रणेमार्फत मिळणारी शिष्यवृत्ती, इतर कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ किंवा शिकविण्याबाबतचे मानधन किंवा फेलोशिप किंवा रिसर्च असोशिएट म्हणून मिळणारी ही रक्कम देय होणाऱ्या शिक्षण शुल्क वा एकूण देय रक्कमे मधून कपात करण्यात येईल.

४) विद्यार्थ्यास परदेशातील विद्यापीठामध्ये प्रवेश घेण्यासाठी व अभ्यासक्रमपुर्ण केल्यानंतर भारतात परत येण्यासाठी भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे जवळच्या मार्गाचा (Shortest Route) दराचा इकोनॉमी क्लासचा विमान प्रवासाचा दर दिला जाईल.

५) विद्यार्थ्यांस परदेशात राहण्याच्या कालावधीसाठी विद्यापीठाने ठरवून दिल्यानुसार वैयक्तिक आरोग्य विमा (Personal Health Insurance) काढणे अनिवार्य राहील. यासाठीचा संबंधीत विद्यापीठाच्या निकषानुसार किमान खर्च शासनाकडून अनुनेज्ञ राहील.

६) वरीलप्रमाणे शिक्षण शुल्क, निर्वाहभत्ता, वैयक्तिक आरोग्य विमा आणि यासाठी निर्धारीत केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही. निर्धारीत दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च विद्यार्थी/उमेदवारास स्वत: सोसावा लागेल व अशा प्रकारचे **हमीपत्र** विद्यार्थ्यास व पालकास अर्जासोबत दयावे लागेल.

७) खालील बाबींवरील खर्च अनुज्ञेय राहणार नाही :

i. व्हिसा अर्जावरील खर्च
ii. विद्यार्थ्याच्या कुटूंबातील सदस्यांचा प्रवास व इतर खर्च
iii.नियमित शिक्षणाच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही अभ्यासक्रम अथवा प्रशिक्षणावरील खर्च
iv. भाषा प्रशिक्षणावरील खर्च
v. नियमित अभ्यासक्रमाच्या कालावधीत अतिरिक्त प्रवासाचा खर्च
vi.संशोधन, पुरक शैक्षणीक साहित्य, क्षेत्र भेटी, कार्यशाळा/सेमिनार,आंतरवसियता (Internship) यामधील सहभागाचा खर्च.
vii. संगणक व तत्सम शैक्षणिक साहित्य.

८) विद्यार्थ्यास वरील लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून, तसे शैक्षणिक संस्था / विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

९) प्रवेशित विद्यार्थ्यांने प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilisation Certificate), खर्चाच्या पावत्या इ. विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाकडून प्रमाणित करुन सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय पुढील हप्ता मंजूर होणार नाही.

१०) सुरुवातीस परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणे आणि विहीत कालावधीत अभ्यासक्रमपूर्ण केल्यानंतर त्वरीत कालमर्यादेत भारतात परत येण्यासाठी नजिकच्या मार्गाने इकॉनॉमी क्लास विमानप्रवासभाडे देण्यात येईल. त्यासाठी विमान प्रवासाचे मूळ तिकीट, मूळ बोर्डींग पास, परतीचे प्रवास भाडे मिळण्यासाठी अभ्यासक्रम विहीत कालावधीत यशस्वीपणे पूर्ण केल्याचा पुरावा इ.कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

११) अपवादात्मक प्रसंगी, विद्यार्थ्यांनी / पालकांनी, परदेशी शिक्षण संस्था / विद्यापीठ, शिक्षण फी / इतर अनुज्ञेय फी स्वत: भरलेली असेल, अशा वेळी आवश्यक त्या पावत्या व पुरावे सादर केल्यानंतर, अशी रक्कम विद्यार्थ्यास देय होणाऱ्या शिष्यवृत्ती मधून विद्यार्थ्यांच्या परदेशातील खात्यावर जमा करणेसाठी संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१२) विद्यार्थ्याने भारतात राष्ट्रीयकृत बँकेत व परदेशात अधिकृत बँकेत खाते उघडणे अनिवार्य आहे. त्याच खात्यावर त्यांना देय होणारी शिष्यवृत्ती CMP किंवा RTGS किंवा SWIFT ने अदा केली जाईल. या खात्याचा तपशिल त्यांने परदेशात जाऊन प्रवेश घेतल्या नंतर तात्काळ संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई / संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सादर करावा. तसेच शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र

कल्याण संचालनालय, पुणे यांनी आवश्यकतेनुसार मागणी केल्यास विद्यार्थ्यांने संबंधित बँक खात्याचा तपशिल संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांना सादर करावा.

१३) परदेशी शिक्षण संस्था / विद्यापीठाने ऑफर लेटर मध्ये संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीच्या निर्धारीत केलेल्या फी च्या मर्यादेतच लाभ संबंधीत विद्यार्थ्यास अनुज्ञेय होतील. भविष्यात त्यामध्ये वाढ झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्तालयाच्या शिफारशीनंतरच ही वाढ संबंधित विद्यार्थ्यास अनुज्ञेय राहील.

**९. कर्तव्यात कसूर** (Default under the scheme) :-

१) या योजनेखाली निवड झालेल्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याने परदेशात शिक्षण घेताना नियमाचे तसेच अटी व शर्तीचे आणि बंधपत्रामध्ये लिहून दिलेल्या बाबींचे उल्लंघन केल्यास, परदेशीय शैक्षणिक संस्थेने अभ्यासाविषयी अथवा वागणूकीविषयी अथवा गैरहजेरी विषयी प्रतिकूल अहवाल दिल्यास, विद्यार्थ्याने प्रवेश अर्धवट सोडला असल्यास, विद्यार्थ्याने जेथे प्रवेश घेतला आहे तो देश सोडून निघून गेला असल्यास किंवा विद्यार्थ्याने दुसरे विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेमध्ये विनापरवानगी प्रवेश घेतला असल्यास, किंवा विद्यार्थ्यांची ज्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे, तो अभ्यासक्रम त्यांने विनापरवानगी बदलल्यास, किंवा तो भारतात कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता परत आल्यास, अशा विद्यार्थ्यास कर्तव्यनिष्ठुर (Defaulter) समजण्यात येईल आणि त्याला देण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम १२% वार्षिक व्याजाने वसूल करण्यात येईल, अशा प्रकारचे संयुक्त हमीपत्र विद्यार्थी व पालक यांनी सादर करणे आवश्यक राहील.

२) कोणतेही कारण अथवा सबबी सांगून अभ्यासक्रम पूर्ण न करणे, विहित प्रयोजनासाठी खर्च न करणे, खर्चात काटकसर न करणे, विहीत लाभ मर्यादेपेक्षा जास्तीची मागणी परदेशात जावून करणे, कोणत्याही प्रकारचा दबाव आणणे किंवा धमकी देणे, सदर नियमावलीतील तरतुदीचे उल्लंघन करणे, परदेशातील नियम/ अटी/ तरतूदीचे उल्लंघन करणे, वाममार्गास लागणे, परदेशातील शैक्षणिक कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करणे व त्यासाठी दंड, शिक्षा होणे, भारतीय राष्ट्रीयत्वास हानी पोहचविणे, भारताची बदनामी करणे याबाबी कर्तव्यातील कसूर समजण्यात येतील. कर्तव्यात कसूर केलेल्या विद्यार्थ्यास / उमेदवारास अपात्र ठरवून त्याच्या परदेश शिक्षणासाठी शासनाने दिलेले सर्व लाभ व्याजासह वसूल केले जातील.

**१०. अर्ज करण्याची पध्दती** :-

१) सदर शिष्यवृत्तीसाठी प्रत्येक वर्षी एप्रिल / मे महिन्यात संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे प्राधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत वृत्तपत्रात तसेच शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करतील. तथापि, शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता ही कार्यवाही सप्टेंबर / ऑक्टोबर, २०१९ मध्ये करण्यात येईल.

२) सदरची योजना या शासन निर्णयातील नियमावली, अटी व शर्ती नुसार राबविण्यासाठी शासन प्राधिकृत करेल त्या यंत्रणेकडुन अथवा संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचे मार्फत राबविण्यात येईल.

३) सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत अथवा शासन निर्धारित करेल इतक्या कालावधीत विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह ऑनलाईन सादर करावेत. अभ्यासक्रमनिहाय असलेल्या क्षमतेच्या अधिन राहून, निवड समितीने निश्चित केलेली पात्र विद्यार्थ्यांची अंतिम निवड यादी साधारणतः दिनांक १ जुलै पूर्वी अथवा निवड समितीच्या निर्णयानंतर शासन जाहीर करेल. तथापि, शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता अंतिम निवड यादी ऑक्टोबर, २०१९ मध्ये जाहीर करण्यात येईल.

४) शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर संबंधीत शिक्षण संचालनालय संबंधित विद्यार्थ्यांना कळवून त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती मागविण्यात येईल. तसेच या विद्यार्थ्याची गृह चौकशी करण्यात येईल.

५) दिनांक १५ जुलैपर्यंत संबंधित विद्यापीठाकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेऊन त्यानंतर १५ दिवसाच्या आत विद्यार्थ्यांना संबंधित परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यकतेनुसार अग्रिम मंजूर करण्यात येईल. तथापि, शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता निधी उपलब्ध होईपर्यंत हा कालावधी आवश्यकतेनुसार शिथील करण्यात येईल.

६) विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेवून आवश्यक ती माहिती व अग्रीम रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र/पोचपावती संबंधित परदेशी शैक्षणिक संस्थेकडून प्रमाणित होऊन प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांस त्या वर्षीचे अग्रिम समायोजित करुन पहिला अर्ध वार्षिक हप्ता अदा करण्यात येईल.

७) प्रत्येक सहा महिन्याने विद्यार्थ्यानी दिलेल्या शिष्यवृत्तीचे (शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाह भत्ता इ.चे) उपयोगिता प्रमाणपत्र आणि प्रगती अहवाल संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांना सादर केल्यानंतर पुढील ६ महिन्याची शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल. प्रत्येक ६ महिन्याला विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र/खर्चाचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यास पुढील शिष्यवृत्ती अनुज्ञेय होणार नाही.

८) सदर अर्जासोबत विद्यार्थ्याने खालील कागदपत्र सादर करणे बंधनकारक आहे :-

(i) विहीत नमुन्यातील परिपुर्ण अर्ज,
(ii) सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला,
(iii) पदवी / पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुरावे. ( सनद/मार्कलिस्ट),
(iv) परदेशातील THE/QS World Ranking २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याबाबतचे विनाअट ( Unconditional) ऑफर लेटर,
(v) ज्या विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाला आहे त्याचे सविस्तर माहिती पत्रकाची (Prospectus) प्रत.
(vi) आवश्यक ते करारनामे व हमीपत्रे.
(vii) दोन भारतीय नागरीकांचे जामीनपत्र,
(ix) संपूर्ण अभ्यासक्रम पुर्ण होण्यासाठी वर्षनिहाय आवश्यक असणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक, ज्यामध्ये शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क पाठयपुस्तके, स्टेशनरी, भोजन व राहण्याचा खर्च, येण्याजाण्याचा विमान प्रवास याचा समावेश असावा.
(x) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.
(xi) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी अद्ययावत THE/QS World Ranking चीजागतिक क्रमवारी.

**११. गुणवत्ता यादी व निवड यादी तयार करण्याची कार्यपद्धती** :-

१) शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणा-या विद्यार्थ्यांपैकी इतर सर्व अटींची पूर्तता होणा-या विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांचे मुल्यांकन खालील प्रमाणे करून त्याचे एकूण गुण विचारात घेऊन गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी :

## अ. पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाकरिता :

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम | प्राप्त केलेले गुण | गुणांचे मुल्यांकन |
|---|---|---|---|
| १. | SSC | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| २. | HSC | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| ३. | पदवी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ७०% | ५ |
| | | ७१ ते ८०% | १५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | ३० |
| ४. | THE and QS World Ranking Average | १ ते ५० | ५० |
| | | ५१ ते १०० | ४० |
| | | १०१ ते १५० | ३० |
| | | १५१ ते २०० | २० |

## आ. डॉक्टरेट अभ्यासक्रमाकरिता :

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम | प्राप्त केलेले गुण | गुणांचे मुल्यांकन |
|---|---|---|---|
| १. | SSC | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| २. | HSC | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| ३. | पदवी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ७०% | ५ |
| | | ७१ ते ८०% | १५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | २० |
| ४. | पदव्युत्तर पदवी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ७०% | ५ |
| | | ७१ ते ८०% | १५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | २० |
| ५. | THE and QS World Ranking Average | १ ते ५० | ४० |
| | | ५१ ते १०० | ३० |
| | | १०१ ते १५० | २० |
| | | १५१ ते २०० | १० |

२) या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी प्रवेश संख्या निर्धारीत केलेली असून त्या मर्यादेत विद्यार्थ्यांची निवड करावयाची आहे. त्यामुळे, निर्धारीत केलेल्या सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रथमत: वरील "अ" व "आ" करीता दोन स्वतंत्र एकत्रित गुणवत्ता याद्या तयार कराव्यात.

३) अ) गुणवत्ता यादी तयार करतांना समसमान (Tie) गुणवत्ता असलेल्या प्रकरणी THE/QS World Ranking जेष्ठताक्रम असलेल्या विद्यार्थ्यास गुणवत्ता यादीत वरचे स्थान देण्यात यावे.

ब) त्यानंतरही समसमान गुण असल्यास पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता पदवी अभ्यासक्रमाचे आणि पीएचडी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे गुण विचारात घेण्यात यावेत.

क) त्यानंतरही समसमान गुणवत्ता असल्यास वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास वरचे स्थान देण्यात यावे.

४) मात्र, गुणवत्ता यादीमध्ये समसमान गुणवत्ता असलेल्या अभियांत्रिकी व विज्ञान या शाखेच्या प्रकरणी वरील ३ ब) व ३ क) चा विचार न करता या विद्यार्थ्यांची निवड करताना Emerging areas of science and technology चा प्राधान्याने विचार केला जाईल. उदा. Atmospheric sciences, Adaptation and mitigation of Climate Change, Automation and Artificial Intelligence, Renewable Engergy, Energy Efficiency Techniques, Biotechnology, Nano Technology, Industry Internet of Things, Basic Analytics इ. अभ्यासक्रमांना प्राधान्य दिले जाईल.

५) गुणवत्ता याद्या तयार केल्यानंतर शासन निर्णयाच्या परिच्छेद-४ प्रमाणे शाखानिहाय पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात यावी. ही निवड करताना एकूण लाभार्थी विद्यार्थ्यांमध्ये ३०% विद्यार्थिनींची निवड करणे आवश्यक आहे. त्यामुळे निवड यादीत निर्धारित प्रमाणात विद्यार्थिनींचा समावेश होत नसल्यास संभाव्य निवड यादीतील उतरत्या क्रमानुसार शेवटच्या विद्यार्थ्या ऐवजी त्याच शाखेच्या विद्यार्थिनीची निवड करण्यात यावी. ही कार्यवाही करीत असतांना अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र शाखेकरीता एकापेक्षा जास्त विद्यार्थिनींची निवड करणे अपेक्षित नाही.

६) पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी जर एखाद्या शाखेमध्ये उमेदवार उपलब्ध झाला नाही तर त्या वर्षापुरते त्याच शाखेमधील पीएचडी अभ्यासक्रमाच्या जागेवर निवड यादीतील जेष्ठता क्रमानुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

७) पीएचडी अभ्यासक्रमासाठी जर एखाद्या शाखेमध्ये उमेदवार उपलब्ध झाला नाही तर त्या वर्षापुरते त्याच शाखेमधील पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या जागेवर निवड यादीतील जेष्ठता क्रमानुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

८) तथापि, त्यानंतरही पदव्युत्तर अभ्यासक्रम/डॉक्टरेटसाठी विहीत करण्यात आलेल्या जागेवर पुरेशा संख्येने विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास/पात्र न ठरल्यास शासन निर्णयाच्या परिच्छेद-४ मधील उतरत्या क्रमवारीनुसार लगतच्या शाखेतील जागा (Vertical Interchange) भरण्याचे अधिकार निवड समितीस राहतील. मात्र, त्यासाठी निवड यादीतील जेष्ठता हा निकष कायम असेल.

९) निवड यादीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात येतील.

## १२. अन्य अटी व शर्ती :-

१) परदेशात अभ्यासक्रम संपल्यानंतर विद्यार्थ्याने दोन महिन्याच्या आत संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांना अंतिम परिक्षेचे गुणपत्र, प्रमाणपत्र आणि प्रगती अहवाल व पदवीदान समारंभाचे छायाचित्रासह माहिती सादर करणे बंधनकारक असेल. त्याशिवाय विद्यार्थ्यास अंतिम विमान प्रवास व इतर लाभ दिले जाणार नाहीत.

२) अभ्यासक्रम संपल्यानंतर या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यास व्हिसा मुदतवाढीसाठी परवानगी दिली जाणार नाही. अभ्यासक्रमाचा कालावधी कोणत्याही कारणास्तव वाढल्यास त्यास अतिरिक्त निधी दिला जाणार नाही.

३) ज्या विद्यापीठामध्ये/शैक्षणिक संस्थेमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला आहे, ते विद्यापीठ/ शैक्षणिक संस्था ही त्या देशातील मान्यताप्राप्त विद्यापीठ/शैक्षणिक संस्था असावी. (Acccredited Universtiy/Institute) या सबंधीची कागदपत्रे अर्जासोबत सादर करावी. या बाबत काही वाद निर्माण झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्त यांचे कडून खात्री करुन निवड समिती त्याबाबत निर्णय घेईल.

४) अर्जात नमूद केलेले विद्यापीठ अभ्यासक्रमासाठी काही कारणास्तव विद्यार्थी प्रवेश घेवू शकत नसल्यास, त्याच विद्यापीठात त्याच अभ्यासक्रमासाठी पुढील एका सत्राचा (६ महिन्याचा) कालावधी, कोणतेही अतिरीक्त शुल्क न आकारता संबंधित विद्यापीठ अथवा शैक्षणिक संस्थेने विनाअट वाढवून दिल्यास आणि विद्यार्थ्याने त्यासाठी सबळ कारण/पुरावा सादर केल्यास अशी मुदतवाढ देण्याचे अधिकार संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांना असतील. तदनंतर विद्यार्थ्यास आणखी मुदतवाढ मिळणार नाही.

५) एकदा निवड झालेले विद्यापीठ व अभ्यासक्रम कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही. मात्र, सबलीकरण विचारात घेवून अशा बदलास मान्यता देण्याचे अधिकार शासनास राहतील.

६) निवड झालेल्या विद्यार्थ्याला विद्यापीठात प्रवेश घेतल्यानंतर तात्काळ काही अगावू रक्कम भरण्याची आवश्यक असल्यास, अशा आगावू रकमेस मान्यता देण्याचे अधिकार संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांना राहतील, मात्र, ही आगावू रक्कम पुढील देय हप्त्यामध्ये समायोजित करण्यात यावी.

७) विद्यार्थ्यांना अर्ज करते वेळी विद्यापीठाकडून मान्य करुन घेतलेल्या संपूर्ण अभ्यासक्रमासाठीच्या कालावधीच्या शिक्षण फी, इतर फी, निवास व भोजनखर्च, निर्वाहभत्ता, आकस्मिक खर्चाची जी महिती सादर केली आहे, त्यापेक्षा जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही.

८) अभ्यासक्रमाच्या कालावधी व्यतिरीक्त कोणत्याही परिस्थतीत वाढीव कालावधीच्या व्हिसासाठी मान्यता देण्यात येणार नाही.

९) विद्यार्थ्याने कोणत्या दिनांकास व कोणत्या विमानाने परदेशात जाणार आहे, याची लेखी माहिती संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांना सादर करणे आवश्यक आहे. ही माहिती न देता विद्यार्थी परदेशात गेल्यास त्यास विमान खर्च अनुज्ञेय होणार नाही.

१०) आवश्यकतेनुसार विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती, उपस्थिती, वर्तणूक, खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व इतर तद्नुषंगिक बाबींचा अहवाल परदेशातील भारतीय दूतावासाकडून प्राप्त करुन घेण्यात येईल.

११) अभ्यासक्रमाचा कालावधी संपल्यानंतर परदेशातील वास्तव्यासाठी कोणताही पत्रव्यवहार संचालनालयामार्फत केला जाणार नाही, अथवा विद्यार्थी/पालक यांचा पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१२) परदेशी विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी GRE (Graduate Record Examination) TOEFL (Test of English as a foreign language), IELTS (International English Langaugae Testing System) इ. प्रकारच्या परीक्षा जेथे अनिवार्य आहेत, त्या उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल.

१४) विद्यार्थ्यांने शिष्यवृत्तीसाठी अर्जामध्ये नमूद केलेले विद्यापीठ व अभ्यासक्रम त्यांचा कालावधी आणि खर्चाचे तपशिल यामध्ये निवड समितीने निवडीची शिफारस केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

१५) काही कारणास्तव विद्यार्थ्यास त्याची निवड होवूनही त्या वर्षी प्रवेश घेता आला नाही, तर त्यास वयोमर्यादेच्या अधिन राहून पुढील वर्षी नव्याने अर्ज करण्याची मुभा राहील.

१६) परदेशातील भारतीय दुतावासात राज्य शासनाकडून संबंधित विद्यार्थ्यांचा प्रगती अहवाल, वर्तणूक खर्चाचा हिशोब इ. माहिती पुरविण्याबाबत विनंती करण्यात येईल. तसेच काही विपरीत बाबी असल्यास, परदेशातील भारतीय दूतावास त्या बाबी राज्य शासनास कळवतील. परदेशात प्रवेशित विद्यार्थ्याच्या प्रगती विषयी मार्गदर्शन व सल्ला देणेबाबत परदेशातील दुतावासास विनंती करण्यात येईल. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना परदेशात काही अडचणी उद्भवल्यास मदत करण्यासाठी या दुतावासास विनंती करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी विद्यापीठात/शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर तात्काळ तेथील भारतीय परदेशी दूतावासास संपर्क साधून आपली नोंदणी करावी व त्याचा तपशिल संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांना सादर करावा.

१७) पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांने ज्या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे त्याविषयाचा, भारतामध्ये कोणत्याही विद्यापीठामध्ये अंतिम प्रबंध अहवाल (Thesis) सादर केला नसल्याबाबतचे घोषणापत्र (Declaration) सादर करणे आवश्यक आहे.

१८) तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी व दर्जावाढीसाठी आवश्यक असलेले शिथीलीकरण करण्याचे अधिकार यापुर्वीच्या शैक्षणिक वर्षासह संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांना असतील.

**१३. खोटी माहिती सादर करणे** :-

कोणत्याही विद्यार्थ्याने खोटी माहिती/कागदपत्रे सादर केल्याचे सिध्द झाल्यास अथवा उपरोक्त परिच्छेदाप्रमाणे कर्तव्यात कसुर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी अटकाव (Debarred) केला जाईल व त्याच्याकडून झालेल्या खर्चाची १५% चक्रवाढ व्याजाने वसूली करण्यात येईल. अशा विद्यार्थी/उमेदवाराचा काळ्या यादीत समावेश केला जाईल. तसेच प्रचलित कायद्यानुसार त्याच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल आणि त्यांनी दिलेले जामीनदार आणि संदर्भ अधिकारी/व्यक्ती यांना सुध्दा ही बाब लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

**१४. कायदेशीर बाबी** :-

या संदर्भात कोणत्याही कायदेशीर बाबी उद्भल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात असतील. परदेशात उद्भवल्यास कायदेशीर बाबीसाठी परदेशातील उच्चायुक्त कार्यवाही करतील.

**१५. छाननी समिती** :-

या शिष्यवृत्तीसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती असेल :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संचालक, *विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे* | - | अध्यक्ष |
| २. | सहसंचालक, *विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे* | - | सदस्य |

३. सह / उपसचिव, *विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई* - सदस्य
४. उपसंचालक, *विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे* - सदस्य सचिव

उपरोक्त समिती प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन अभ्यासक्रम निहाय पदव्युत्तर पदवी व डॉक्टरेटसाठी राखीव कोटयानुसार आणि परदेशातील विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेच्या जागतिक क्रमवारीच्या जेष्ठतेनुसार पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव निवड समितीकडे अंतिम करण्यासाठी पाठवेल.

**१६. निवड समिती** :-

उपरोक्त छाननी समितीमार्फत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादी/प्रस्तावामधून पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी तयार करणेसाठी निवड समितीची रचना खालील प्रमाणे असेल :-

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, *विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,* - अध्यक्ष
२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त - सदस्य
३. प्रधान सचिव/सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता - सदस्य
४. संचालक, *विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे* - सदस्य
५. सह / उपसचिव, *विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई* - सदस्य
६. सहसंचालक, *विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे* - सदस्य
७. आयआयटी, पवई, मुंबई या संस्थेचा किमान प्राध्यापक दर्जाचा प्रतिनिधी - सदस्य

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: CN = Bhaurao Raghunath Gavit, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = VJNT OBCS SBC Welfare Dept.
Date: 2018.10.12 18:18:52 +05'30'

( भा.र. गावित )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था(टीआरटीआय), पुणे,डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या अथवा करण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती, प्रशिक्षण, कौशल्य विकास व विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्ती या योजनेमध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता सर्वंकष धोरण निश्चित करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्र.सान्यावि-२०२४/प्र.क्र.७७/बांधकामे**
पहिला मजला, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २५ जुलै, २०२४

वाचा:-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सान्यावि-२०२३/ प्र.क्र.६०(४)/बांधकामे, दि. ३०.१०.२०२३
२. शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सान्यावि-२०२३/ प्र.क्र.६०(४)/बांधकामे, दि. ०९.११.२०२३
३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र इबीसी-२०१७/ प्र.क्र.२८८/शिक्षण-१, दि.२७.६.२०१७
४. शासन निर्णय, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.सारथी २०२२/प्र.क्र२८९/का.१४२५-अ, दि.२०.०७.२०२३
५. शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती-२०१८/प्र.क्र.११८/ शिक्षण, दि.११ ऑक्टोबर,२०१८
६. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण २०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४ दि.०४ ऑक्टोबर,२०१८
७. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.१५२२ / प्र.क्र१२ (भाग-१)/का.१२ दि.०७ मार्च २०२४
८. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र.अविवि २०१९ / प्र.क्र २११ /का-६ दि.२३ नोव्हेंबर २०२३
९. मा.मंत्रिमंडळाचा दि.११.०७.२०२४ रोजीचा निर्णय.

**प्रस्तावना:-**

मा.मंत्रिमंडळाच्या दि.१९.१०.२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार सामाजिक न्याय विभागाच्या दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय),पुणे,डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या तसेच, भविष्यात प्रस्तावित करण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, वसतिगृह व वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारा निर्वाह भत्ता,स्वाधार,स्वयंम अशा विविध प्रकारच्या योजनांमध्ये एकसमानता रहावी यासाठी सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. याकरीता अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रम कायमस्वरूपी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव, वित्त विभाग | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव, इ.मा.ब.क. विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विभाग | सदस्य |
| ७ | सचिव, सा.न्या. व वि.स. विभाग | सदस्य सचिव |

३. दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या अधिछात्रवृत्ती व परदेशी शिष्यवृत्तीच्या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी गेल्या काही दिवसांपासून बार्टी,सारथी,महाज्योती,टीआरटीआय इत्यादी स्वायत्त संस्था व संबंधित विभागाच्या विद्या संघटनांकडून करण्यात येत आहे. तसेच विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्तीच्या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधी व विद्यार्थी संघटना यांचेमार्फत करण्यात येत आहे. उपरोक्त मागण्यांच्या संदर्भात अधिछात्रवृत्ती व परदेश शिष्यवृत्ती यांमध्ये बदल करणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या अधिछात्रवृत्ती व परदेश शिष्यवृत्तीच्या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी गेल्या काही दिवसांपासून बार्टी,सारथी,महाज्योती,टीआरटीआय इत्यादी स्वायत्त संस्था व संबंधित विभागाच्या विद्यार्थी संघटनांकडून करण्यात येत आहे. तसेच विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्तीच्या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधी व विद्यार्थी संघटना यांचेमार्फत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने, मा.मंत्रिमंडळाच्या दि.११.०७.२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार अधिछात्रवृत्ती व परदेश शिष्यवृत्ती या योजनांच्या निकषांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**(अ) अधिछात्रवृत्ती –**

१. दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयापूर्वी बार्टी- (प्राप्त अर्ज- ७६३), सारथी (प्राप्त अर्ज १३२९), महाज्योती (प्राप्त अर्ज १४५३) या संस्थांमार्फत देण्यात आलेल्या अधिछात्रवृत्ती जाहिरातींनुसार आलेल्या अर्जांमधील कागदपत्रांची पडताळणी करून व शपथपत्र घेऊन एकूण ३५४५ संशोधक विद्यार्थ्यांपैकी पात्र संशोधक विद्यार्थ्यांना ५० टक्के दराने सरसकट अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. बार्टी, सारथी, महाज्योती या संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेली मर्यादा २०० वरून ३०० इतकी करण्यात येत आहे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेली मर्यादा १०० वरून २०० इतकी करण्यात येत आहे.

३. यु.जी.सी. (University Grants Commission) मार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.

४. यु.जी.सी. (University Grants Commission) मार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार Date of Award पासून फेलोशिपचा लाभ देण्यात यावा.

**(ब) परदेश शिष्यवृत्ती:-**

परदेश शिष्यवृत्ती योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग, नियोजन विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग या विभागांमार्फत स्वतंत्रपणे राबविण्यात येत आहे. या सर्व विभागांच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेत एकवाक्यता येण्याच्या उद्देशाने सदर योजनेच्या निकषांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. शैक्षणिक अर्हता- परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५ टक्के गुणांसहीत पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. तसेच पीएच.डी.अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून किमान ५५ टक्के गुणांसहीत पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

२. परदेशातील शैक्षणिक संस्थेने Offer Letter मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी ही संबंधित यंत्रणेने थेट संबंधित शैक्षणिक संस्थेस अदा करावी .

३. एकाच कुटूंबातील कमाल पात्रता धारक :-

(अ) परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल. मात्र, या योजनेअंतर्गत पदव्युत्तर पदवीचा अभ्यास सुरु असतांना त्या विद्यार्थ्यास डॉक्टरेट पदवी (पीएच.डी) साठी शासन निर्णयात अंतर्भूत विषयांत दर्जावाढ करण्याची संधी मिळाल्यास सदर विद्यार्थी याच योजनेअंतर्गत पुढील अभ्यासक्रमासाठी लाभ घेण्यास पात्र असेल. त्यासाठी विद्यार्थ्याने निवड समिती/शासनास रितसर अर्ज करून मान्यता घेणे बंधनकारक राहील. अशा प्रकरणात संबंधित शैक्षणिक संस्थेची जागतिक क्रमवारी (QS World Ranking) त्यावेळी लागू

असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकरणात विद्यार्थ्यास मिळणारा एकूण लाभाचा कालावधी त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेतच दिला जाईल. उदा.विद्यार्थ्याने दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम करतांना डॉक्टरेट (पीएच.डी) करण्यासाठी परदेशी शैक्षणिक संस्थेत दर्जावाढ प्राप्त केली तर त्या विद्यार्थ्याला शासनाने विहित प्रक्रियेद्वारे मान्यता दिल्यास त्यानंतरच्या पुढील दोन वर्षांसाठी शासन निर्णयातील नमूद सर्व लाभ घेता येतील. या कालावधी नंतर होणारा पुढील संपूर्ण खर्च मात्र विद्यार्थ्याला करावा लागेल.

(आ) एकाच कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करून देणे बंधनकारक असेल.

(इ) एका वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत एका कुटूंबातील दोन पाल्यांचा समावेश असल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत जागा रिक्त राहील्यास एका कुटूंबातील दुसऱ्या पाल्यास लाभ देण्यात येईल.

४. **विद्यार्थी निवडीचे निकष:** एकदा किमान शैक्षणिक अर्हता निश्चित केल्यावर विद्यार्थ्याच्या केवळ भविष्याच्या अनुषंगाने अधिक लाभ मिळू शकेल या दृष्टीने त्या वर्षीच्या QS World Ranking ची गुणवत्ता क्रमवारी लक्षात घेऊन विद्यार्थांची गुणवत्ता यादी बनवावी. दोन किंवा अधिक विद्यार्थ्यांची विद्यापीठाची क्रमवारी समान असल्यास अशा प्रसंगी त्यांच्या लगतच्या पदवी परीक्षेची गुणवत्ता लक्षात घ्यावी.

५. कुटूंबाची उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रू.८.०० लक्ष इतकी राहील.

६. परदेश शिष्यवृत्ती बाबत विद्यार्थी निवड प्रक्रिया वेळेच्या शिस्तीत होणे तसेच त्या अनुषंगाने पुढील प्रक्रिया शीघ्रतेने होणे गरजेचे असल्याने त्याबाबत सर्व निर्णय त्या विभागाच्या सचिव स्तरावर घेण्यात यावे.

७. निवड प्रक्रियेची निकड लक्षात घेता विद्यार्थी पुर्ण क्षमतेने उपलब्ध न झाल्यास संबंधित विभागास वर्षातून एक पेक्षा अधिक वेळा निवड प्रक्रिया राबविण्याची मुभा राहील. मात्र त्यात विद्यार्थांचे मेरीट डावलले जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

८. आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्ती योजनेकरीता विहित निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास कुटूंबाच्या उत्पन्नाची वार्षिक मर्यादा व QS World Ranking ची मर्यादा शिथील करून विद्यार्थ्यांस परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येईल. तथापि, सदर लाभ देतांना उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रू.८.०० लाखापासून जास्तीत जास्त रू.१०.०० लाखांपर्यंत शिथिल करण्यात यावी. तसेच QS World Ranking ची मर्यादा २०० पासून पुढे चढत्या क्रमाने मंजूर पदे भरेपर्यंत ग्राह्य धरण्यात यावी.

९. अल्पसंख्यांक विभागाच्या परदेश शिष्यवृत्तीची विद्यार्थी संख्या २७ वरून ७५ एवढी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०.विद्यार्थ्यास खालील बाबींवर होणाऱ्या खर्चाचा भार हलका व्हावा म्हणून दरवर्षी यु.एस.ए. व इतर देशांसाठी (यु.के. वगळून) १५०० युएस डॉलर, आणि यु.के. साठी ११०० जीबीपी इतका निर्वाह भत्ता /इतर खर्च/ आकस्मिक खर्च म्हणून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

- आवश्यक ती क्रमिक पुस्तके

- वह्या व स्टेशनरी
- प्रबंध अहवाल तयार करणे
- टायपिंग बायडींग
- स्थानिक भेटी व इतर अभ्यास सहली प्रवास खर्च
- प्रबंधासाठी आवश्यक खर्च
- इतर प्रासंगिक खर्च

११. विद्यार्थ्यांची अर्हता, उत्पन्न मर्यादा, निवडीचे निकष, निवड पद्धती, तसेच विद्यार्थ्यास मिळणारे आर्थिक लाभ तसेच शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांची संख्या याबाबत बदल करावयाचे असल्यास दि. ३० ऑक्टोबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या कायमस्वरूपी समितीने निर्णय घ्यावा.

**(क)महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) संस्थेचा वार्षिक कृती आराखडा सन २५-२०२४:-**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थेने सन २०२४-२५ या वर्षाकरीता सादर केलेला रू.४५३.६६ कोटी इतक्या रकमेच्या वार्षिक कृती आराखड्यास अर्थसंकल्पीय तरतूदीच्या रू.३००.०० कोटीच्या मर्यादेत चालू आर्थिक वर्षी मान्य करून उर्वरित रू.१५३.६६ कोटी इतक्या रकमेस पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधीन राहून यावर्षी मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(ड)** सर्वंकष एकसमान धोरणाच्या अनुषंगाने सादर करण्यात येणाऱ्या सर्व प्रस्तावांबाबत अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीने सात दिवसात बैठक घेऊन निर्णय घ्यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०७२५१५४६१३०७२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

SOMNATH NAMDEO BAGUL

Digitally signed by SOMNATH NAMDEO BAGUL DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, Date: 2024.07.25 16:40:37 +05'30'

**( सो. ना. बागुल)**
**सह सचिव ,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई, महाराष्ट्र राज्य,
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
३. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (गृह व विधी) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
४. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
५. मा. विरोधी पक्षनेता विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
६. मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,

७. मा. राज्यमंत्री ( सा.न्या.) यांचे खाजगी सचिव,
८. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
९. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
१०. सर्व सन्माननीय सदस्य, विधान सभा/ विधान परिषद
११. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, महाराष्ट्र राज्य,
१२. मा. अमुस/प्रधान सचिव/सचिव (सर्व) मंत्रालयीन विभाग,
१३. मा. सचिव (सा.न्या.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१४. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
१५. महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
१६. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था ,(टीआरटीआय)पुणे,
१७. संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी) पुणे,
१८. संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था ,नागपूर (महाज्योती)
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी ,(अमृत)मुंबई
२०. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
२१. सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण,
२२. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२३. निवडनस्ती (बांधकामे).

महाराष्ट्र शासन

**इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,**

**आकार प्रिमायसेस , दुसरा मजला, एम.एच.बी. कॉलनी, म्हाडा कमर्शिल कॉप्लेक्स**

**समता नगर, येरवडा, पुणे ४११ ००६**

दुरध्वनी क्र. ०२०-२६०५१८१४/ २६१२७८८० ईमेल dvintobcsbcwpune@gmail.com


जा..क्र.इमावबकसं/परदेशशिष्य./जाहिरात नुमना/२०२५-२६/ २०९८ दि. ०९/०४/२०२५

**विजाभज इमाव व विमाप्र प्रवर्गाती , मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागातंर्गत महाराष्ट्र राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदवीका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS (Quacquarelli Symonds ) Raking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील अशा ७५ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबतची योजना शासन निर्णय क्र. शिवृत्ती २०१८/प्र.क्र.११८/शिक्षण, दि. ११.१०.२०१८ अन्वये राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसावी शाखानिहाय/ अभ्यासक्रमनिहाय जागा उपलब्ध आहे. त्या करिता पात्र लाभार्थ्याकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**योजनेच्या अटी व शर्ती**

- विद्यार्थी विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवासी असावा.
- विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे.
- पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएचडीसाठी ४० वर्षे ही कमाल वयोमर्यादा असेल.
- विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे सन २०२४-२५ चे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे. टीप पुढीलप्रमाणे :-
- विवाहित महिला उमेदवारांसाठी पतीकडील कुटुंबाचे एकत्रीत वार्षिक उत्पन्न दाखविणे आवश्यक आहे.
- जर अर्जदार स्वतः किंवा अर्जदाराचे आई वडील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत, पती/पत्नीपासून विभक्त राहत असल्यास कायदेशीर कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
- महिला उमेदवार विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत किंवा पती पासून विभक्त असल्यास जर वडीलांकडे वास्तव्यास असेल तर वडीलांकडील कुटुंबाचे एकत्रीत वार्षिक उत्पन्न दाखविणे आवश्यक आहे.
- शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३०% जागा मुलींसाठी राखीव असतील.
- परदेशातील शिक्षण संस्थेत प्रवेश घेणाऱ्या वा प्रवेशित असलेल्या प्रथम, व्दितीय व तृत्तीय वर्षातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येईल; परंतु व्दितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना पुर्ण केलेल्या अभ्यासक्रम कालावधीची शिष्यवृत्ती अनुज्ञेय असणार नाही.
- एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल. त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश
- शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करुन देणे बंधनकारक असेल. एका वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत एका कुटुंबातील दोन पाल्यांचा समावेश असल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत जागा रिक्त राहिल्यास एका कुटुंबातील दुसऱ्या पाल्यास लाभ देण्यात येईल.तसेच सदरची शिष्यवृत्ती एकाच वेळेस मान्य करण्यात येईल. एकापेक्षा जास्त वेळेस विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही.
- भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेत व पीएचडी साठी पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५% गुण असणे आवश्यक आहे. परदेशातील शिक्षण संस्था ही जागतीक क्रमवारीत (QS World University Rank) २०० च्या आत असावी, (सन २०२५ ची QS Ranking)
- अटी व शर्ती ह्या सविस्तर जाहिराती प्रमाणे तसेच, विभागाच्या शासन निर्णय दिनांक ११.१०.२०१८ व एकसमान धोरण ठरविण्याबाबत सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३०.१०.२०२३, दिनांक २५.०७.२०२४ व नियोजन विभागाच्या दिनांक २०.०७.२०२३ च्या शासन निर्णयानुसार लागू राहतील. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. सारथी २०२२/प्रक्र.२८२/का.१४२५-अ, दि. २०.०७.२०२३ मधील तरतूदीन्वये एकदा निवड झालेले विद्यापीठ व अभ्यासक्रम कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत उपरोक्त तक्त्यात नमूद अभ्यासक्रम / शाखानिहाय एकूण जागेच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार निवड समितीस / शासनास राहतील.

इच्छूक विद्यार्थ्यांनी www.maharashtra.gov.in किंवा https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in या वेबसाईट वरुन अर्ज डाऊनलोड करुन तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक १७/०५/२०२५ पर्यंत सायंकाळी ६.१५ वाजे पर्यंत समक्ष किंवा पोस्टाने **इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, आकार प्रिमायसेस , दुसरा मजला, एम.एच.बी. कॉलनी, म्हाडा कमर्शिल कॉप्लेक्स समता नगर, येरवडा, पुणे ४११ ००६** येथे दोन प्रतित सादर करण्यात यावा.

**योजनेतील लाभाचे स्वरुप**

- परदेशातील शैक्षणिक संस्थेने Unconditional Offer Letter मध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी ही संबंधित यंत्रणेने थेट संबंधित शैक्षणिक संस्थेस अदा करावी.
- विद्यार्थ्यांस होणा-या खर्चाचा भार हलका व्हावा म्हणून दरवर्षी यु.एस.ए. व इतर देशासाठी (यु.के. वगळून) १५०० युएस डॉलर, आणि यु.के. साठी ११०० जीबीपी इतका निर्वाह भत्ता /इतर खर्च आकस्मिक खर्च म्हणून देण्यात येईल विद्यापीठाच्या निकषानुसार वैयक्तिक आरोग्य विमा खर्च अनुज्ञेय असेल.
- भारत सरकारच्या नॅशनल ओव्हरसिज स्कॉलरशिप या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांस अनुसरुन दरवर्षी यु.एस.ए.व इतर देशांसाठी (यु.के. वगळून) १५४०० यु.एस. डॉलर्स आणि यु.के. साठी ९९०० जीबीपी इतकी रक्कम किंवा विद्यार्थ्यास प्रत्यक्ष येणारा खर्च यापैकी कमी असणारी रक्कम अनुज्ञेय असेल.
- विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर भारतात परत येताना नजिकच्या मार्गाने (EconomyClass) विमान प्रवासाचा खर्च अनुज्ञेय असेल.

*******************************************************************

- परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्जाचा नमुना, शासन निर्णय, शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या अन्य महत्वाच्या अटी शर्ती इ. सविस्तर माहितीसाठी विभागाच्या पुढील संकेतस्थळाला भेट द्यावी. https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in
  सदरील वेबसाईट वरुन अर्ज डाऊनलोड करुन तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक:- १७ /०५ /२०२५ पर्यंत सायंकाळी ६.१५ वाजे पर्यंत समक्ष किंवा पोस्टाने **इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, आकार प्रिमायसेस , दुसरा मजला, एम.एच.बी. कॉलनी, म्हाडा कमर्शिल कॉप्लेक्स समता नगर, येरवडा, पुणे ४११ ००६**
- www.maharashtra.gov.in किंवा https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील या लिंकवर जाऊन भेट द्यावी.

**स्थळ पुणे :**

**दिनांक : / ०४ /२०२५**

**ज्ञानेश्वर खिलारी(भा.प्र.से.)**

संचालक,इतर मागास बहुजन समाज कल्याण,

महाराष्ट्र राज्य, पुणे

# -अर्जाचा नमुना-

*विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना-सन २०२४-२०२५ साठी अर्ज.*

| अर्जदाराचा<br><br>फोटो<br><br>(स्व साक्षांकित) |
|---|

**प्रति,**
**मा. संचालक,**
**इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, ३, चर्च पथ, पुणे- ४११ ००१.**

**विषय : विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजनेसांठी अर्ज सादर करणेबाबत...(सन२०२४-२०२५)**

**महोदय,**

**विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मी माझी वैयक्तिक व कुटुंबाची माहिती या अर्जाव्दारे खालीलप्रमाणे सादर करीत असून मला सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी, अशी विनंती आहे.**

**अ) अर्जदाराची सर्वसाधारण माहिती:-**

| | | |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव :- | |
| अ. | ज्या अभ्यासक्रमासाठी दावा करु इच्छितो त्या अभ्यासक्रमाचा प्रकार व शाखा- (PG/PhD ) | अ) P G / Ph D:- ----------------------- |
| ब. | कला/वाणिज्य/विज्ञान/व्यवस्थापन/अभियांत्रिकी/वैद्यकीय/विधी यापैकी लागु असेल ते नमुद करावे.* | शाखा :- |
| **२.** | **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :-** | |
| **३.** | **भ्रमणध्वनी क्रमांक :-** | |

| | | |
|---|---|---|
| ४ | विद्यार्थ्याची जात व प्रवर्ग :- | |
| ५ | (अ) विद्यार्थ्याची जन्म तारीख :-<br><br>(ब) दि.१ मे, २०२४ रोजीचे वय:- | (अंकामध्ये ) ----------------------------------<br>(अक्षरी) ------------------------------------<br>------वर्षे |
| ६ | विद्यार्थ्याचा ई-मेल :- | |
| ७ | विद्यार्थ्याचा आधार (AADHAR) क्रमांक/नोंदणी क्रमांक:-( प्रत जोडावी) | |
| अ. | विद्यार्थ्याचा PAN क्रमांक:- | |
| ८ | महाराष्ट्र राज्याचा रहिवास आहे काय ? | |
| ९ | शैक्षणिक स्थिती/पात्रता माहिती-टिप-CGPA/GPA Conversion प्रमाणपत्राचे आधारे टक्केवारी नमुद करणे व ते जोडलेले नसल्यास अपात्र ठरविण्यात येईल. | |

| परीक्षेचे नांव | उत्तीर्ण अभ्यासक्रमाचे नांव | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | उत्तीर्ण झालेल्या शैक्षणिक संस्थेचे नांव व विद्यापीठाचे नांव | विद्यापीठाचे एकूण गुण | प्राप्त केलेले गुण | गुणांची टक्केवारी Grade/GPA etc असल्यास टक्केवारी दर्शविलेले प्रमाणपत्र जोडणे |
|---|---|---|---|---|---|---|
| SSC | | | | | | |
| HSC | | | | | | |
| पदवी | | | | | | |
| पदव्युत्तर पदवी | | | | | | |
| पदव्युत्तर / पदवीका | | | | | | |
| RE | | | | | | |
| TOEFL/ IELTS | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| १० | (अ) विद्यार्थ्याचा व्यवसाय<br>(ब) नोकरी करीत असल्यास नोकरीचा तपशील<br>(क) हुद्दा /पदनाम<br>(ड) अर्जदारास व्यवसाय/नोकरीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न (पुरावा जोडावा)<br>(इ) नोकरी करीत असल्यास कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडले आहे काय? | |

| | | |
|---|---|---|
| | (फ) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा संपुर्ण पत्ता:- | |
| | (ह) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक:- | |
| | (ग)विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा ई मेल- | |
| ११ | (अ) वैवाहिक स्थिती-(लागू असलेल्या ठिकाणी खुण करावी) | विवाहित/अविवाहित/विधवा/घटस्फोटीत /परितक्ता/पतीपासून विभक्त |
| | (ब) विवाहीत असल्यास पती किंवा पत्नीचे व मुलांची नावे, वय, व उमेदवाराशी नाते | १.<br>२.<br>३. |
| | (क) विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत<br>(i) पतीचे नावं व संपूर्ण रहिवास पत्ता<br>(ii) पतीचे व्यवसाय/नोकरी करत असलेल्या ठिकाणाचे नावं, पदनांम व नोकरीच्या ठिकाणाचा पत्ता<br>(iii) पतीचे आधार कार्ड व पॅन कार्ड क्र (प्रत सोबत जोडावी)<br>(iv) मुले शिकत असल्यास त्यांचे जन्मदाखला (प्रत जोडावी)<br>(v) त्यांना परदेशात सोबत घेवून जाणार का? | |
| | (ड) विधवा/घटस्फोटीत/परितक्ता/पतीपासून विभक्त असलेल्या महिला उमेदवार वडीलांकडे राहत असल्यास व त्यांचे उत्पन्न प्रमाणपत्र सादर करीता असल्यास विधवा/घटस्फोट/परितक्ता/ पतीपासून विभक्त असल्याचे कायदेशीर कागदपत्रांचा तपशील (प्रत जोडावी) | |
| १२ | विद्यार्थ्याच्या आधार संलग्न भारतातील बँक खात्याची माहिती-<br>१.खातेदाराचे नाव-<br>२.बँकेचे नाव-<br>३.बँक शाखेचे नाव-<br>४.खाते क्र.-<br>५.IFSC क्र.-<br>६.MICR क्र.- | |
| १३ | पासपोर्ट क्रमांक-<br>जारी दिनांक-<br>वैधता दिनांक- | |
| १४ | अ. विद्यापीठाचे ऑफर लेटर क्र. व दिनांक- | |
| | ब. ऑफर लेटर विनाअट/अटीसहीत (नमूद करावे) | |

| | | |
|---|---|---|
| | क. ऑफर लेटर अटीसह असल्यास कोणती अट आहे? ते नमूद करावे. | |
| | ड.ऑफर लेटरमधील अभ्यासक्रम | |
| | इ. ऑफर लेटर निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे नाव व पदनाम. | नाव : ------------<br>पदनाम :- ------------ |
| १५ | यापुर्वी आपण राज्य किंवा केंद्र शासनाच्या परदेश शिष्यवृत्तीचा लाभ घेतला आहे काय ?<br>i)असल्यास वर्ष-<br>ii)परदेशातील शैक्षणिक संस्थेचे नाव व देश-<br>iii) अभ्यासक्रमाचे नाव-<br>iv) अभ्यासक्रमाचा कालावधी-<br>v) मिळालेली शिष्यवृत्तीची रक्कम- | होय/नाही------------ |
| (ब) अर्जदाराच्या पालकांची सर्वसाधारण माहिती:- | | |
| १ | (अ) विद्यार्थ्यांच्या पालकाचे संपूर्ण नांव:- | |
| | (ब) पालकांचा निवासस्थानाचा पूर्ण पत्ता:- | |
| | (क) संपर्काचा दूरध्वनी क्रमांक:-<br>(ख) (एस.टी.डी..कोडसह / मोबाईल क्रमांक)<br>(ग) (ड) ई-मेल पत्ता:- | |
| २ | (अ) विद्यार्थ्याचा पालकांचा व्यवसाय<br>(ब) पालक नोकरी करीत असल्यास नोकरीचा तपशील<br>(क) हुद्दा /पदनाम<br>(ड) पालकांस व्यवसाय/नोकरीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न (पुरावा जोडावा) | |
| | (ब) पालकांच्या कार्यालयाचा पत्ता:- | |
| | (क) कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक:- (एस.टी.डी कोडसह) | |
| | (ड) कार्यालयाचा ई -मेल पत्ता:- | |
| (क) कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळुन एकत्रित वार्षिक उत्पन्नाबाबतची माहिती:- | | |
| १ | कुटुंबातील सर्व व्यक्तीचे सन २०२२-२३ मधील सर्व मार्गाने मिळणारे एकूण उत्पन्न:-<br>(यामध्ये विद्यार्थी व कुटुंबात इतर व्यक्ती नोकरी अथवा व्यवसाय करीत असल्यास त्यांचे एकत्रित उत्पन्न उत्पन्नाच्या दाखल्यात नमूद करावे व त्याबाबतचे आयकर विवरणपत्र अर्जासोबत सादर करावे. वडील हयात नसल्यास तसा अर्जात उल्लेख | १. एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये --------------- जोडलेले आहे / नाही<br>२. आयकर विवरणपत्र ------------ जोडलेले आहे / नाही.<br>३. वडील हयात नसल्यास मृत्युचा दाखला |

| | | |
|---|---|---|
| | **करुन मृत्यूचा दाखला जोडणे आवश्यक आहे किंवा विभक्त असल्यास तसे अर्जात नमूद करुन त्याबाबतचे न्यायालयाचे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.)** | जोडलेला आहे / नाही.<br><br>४. आई वडील विभक्त असल्यास न्यायालयाचे संबंधित कागदपत्र जोडलेले आहे / नाही. |

**(ड) विद्यार्थ्याच्या कुटुंबाची माहिती :- विदयार्थ्याच्या माहितीसह (सोबत रेशनकार्ड आवश्यक)**

**१ विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा तपशील:-**

| अ. क्र. | संपूर्ण नांव | वय | विद्यार्थ्याशी असलेले नाते | व्यवसाय | एकूण वार्षिक उत्पन्न | यापूर्वी राज्य/केंद्र शासनाच्या परदेश शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला आहे का? |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | स्वत: | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |
| ९ | | | | | | |
| १० | | | | | | |
| | | कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न- | | | | |

| | | |
|---|---|---|
| २ | **विद्यार्थी वगळून कुटुंबातील इतर व्यक्तीने परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतला असल्यास:-** | |
| | **i. प्रवेशाचे वर्ष-** | |
| | **ii .प्रवेश घेतलेले विद्यापीठ व देशाचे नाव-** | |
| | iii .महाराष्ट्र शासन-केंद्र शासन किंवा इतर राज्य/ | |

**(इ) परदेशातील शैक्षणिक संस्थेतील/विद्यापीठातील प्रवेशाबाबत माहिती:-**

| | | |
|---|---|---|
| १ | (अ) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या परदेशातील विद्यापीठाचे नांव:- | |
| | (ब) QS World University Ranking सन मे,२०२३ चे नमूद करावे | |
| | **(क) विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव:-** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (ड)अभ्यासक्रमाचे स्वरुप (पुर्णवेळ /अर्धवेळ/ online/ Executive) यापैकी कोणते ते नमूद करावे. | | | | |
| | (इ) अभ्यासक्रमाचा किमान कालावधी:- | | | | |
| | (फ) विद्यापीठ प्रवेश दिनांक:- | | | | |
| | (ग) परदेशातील विद्यापीठाच्या पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता:- | | | | |
| | (घ) परदेशातील विद्यापीठाचा दूरध्वनी क्रमांक (ISD कोडसह) :- | | | | |
| | (ह) परदेशातील विद्यापीठाचा ई-मेल:- | | | | |
| (फ) ऑफर लेटरनुसार परदेश शिक्षणासाठीचा खर्च:- | | | | | |
| १ | विद्यार्थ्यांने परदेशातील अभ्यासक्रमासाठी भरलेल्या / भरावयाच्या फी (शुल्क) चा तपशील | एका वर्षाचा खर्च | | संपूर्ण अभ्यासाक्रमाचा खर्च | |
| | | विदेशी चलनात | भारतीय चलनात(₹) | विदेशी चलनात | भारतीय चलनात(₹) |
| | शिक्षण फी-<br>परीक्षा फी-<br>नोंदणी फी-<br>जेवणाचा / राहण्याचा खर्च-<br>विमा खर्च-<br>व्हिसा खर्च -<br>अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेला इतर खर्च (तपशील जोडावा) | | | | |
| | एकूण सर्व खर्च- | | ₹ | | ₹ |
| २ | विद्यार्थ्याला खालीलपैकी मंजूर झालेल्या/प्राप्त होणाऱ्या बाबींचा तपशील-<br>१. विद्यापीठातील इतर शिष्यवृत्ती<br>२. Fellowship<br>३. Graduate Teacher Assistance ship<br>४. इतर मानधन<br>५. Campus job/library | | | | |

आम्ही असे जाहीर करतो की, वर सादर केलेली सर्व माहिती संपूर्णत: सत्य आहे ही माहिती खोटी आढळल्यास अर्जदार सदर शिष्यवृत्तीस अपात्र ठरेल. तव्दतच या योजनेशी संबंधीत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके, अटी व शर्ती मला बंधनकारक असतील. मी अनुसूचित जातीच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना या योजनेतील शासन निर्णय व नियमावली वाचली असून त्यामध्ये नमूद सर्व भाग, प्रतिज्ञापत्र, ना हरकत पत्र, Surety Bond व इतर आवश्यक बंधपत्रे व हमीपत्रे सादर करण्यास हरकत नाही व ती सर्व मी सोबत सादर करीत आहे. सदर शासन निर्णय दि. २७.०६.२०१७ मधील "कर्तव्यात कसुर" हा परिच्छेद मी वाचून समजून घेतला आहे व तो मला मान्य असून मी सर्व बाबींचे पालन करीन व भारत देशाची कोणत्याही

प्रकारची नामुष्की परदेशात होईल असे गैरवर्तन वा गैरकृत्य मी करणार नाही याबाबत याव्दारे मी हमी देत आहे.

माझी निवड झाल्यास मी तात्काळ परदेशातील भारतीय दुतावासाशी संपर्क करुन तेथे माझी नोंदणी करुन ती आपणास त्वरीत सादर करेन.

तसेच नजिकच्या काळात योजने अंतर्गत पालकांच्या कुटूंबाच्या उत्पन्न मर्यादेत तसेच जागांमध्ये वाढ झाल्यास त्यानुसार जाहिरातीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे, सुधारणा करण्याचे व फेरअर्ज मागविण्याचे अधिकार शासन राखून ठेवीत आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून परदेश शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत याची मला जाणीव असून सदरहु बाब मला मान्य आहे.

ठिकाण : पालकाची सही : विद्यार्थ्यांची सही :

दिनांक : / /२०२४ पालकाचे नांव : विद्यार्थ्यांचे नांव :

**(टिप- निवडीनंतर सादर करावयाचे आहे.)**

**(रु.५००/- च्या स्टँम पेपर वर करणे)**

**विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजनेसाठीचे**

**(सन २०२४-२५)**

**-बंध पत्र-**

मी/आम्ही (१) विद्यार्थ्याचे संपुर्ण नांव ---------------------------------------------------- --------वय ------------- राहणार ---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------- (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह)------ ------------------------------ (२) विद्यार्थ्याच्या पालकाचे नांव --------------------------- ------------------------------------------------------ वय -------------राहणार ---- ---------------------------------------------------------------------------------------- ------(संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह)----------------- --- (३) जामीनदाराचे नांव ------------- -------------------------------------------------------------- वय --------राहणार ----- ---------------------------------------------------------------------------------------- -------- -------------------- (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह)-------

१. मी/आम्ही सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो / करते व हमी देतो ते येणे प्रमाणे,

२. **विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या** मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी **परदेशी** शिष्यवृत्ती योजना.

३. मी (विद्यार्थी)---------------------------------- (वर्ष नमूद करावे) सन --------- वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी (देशाचे नांव) ---------------------------येथील ------------- ----------(विद्यापीठ / शिक्षण संस्थेचे नांव व पत्ता) ---------------------------------------- - ----------------------- येथे (अभ्यासक्रमाचे नांव) ------------------------------------------ ---------------------------------------------साठी प्रवेश घेतला आहे.

४. मी (पालकांचे नाव)-------------------------------------------------(विद्यार्थ्याचे नाव)------- ----------------------हया विद्यार्थ्यांचा -------------------- (नाते) आहे. मला एकूण - --------------मुले ---------- मुली --------- असून यापैकी आता पर्यंत कोणीही या योजनेचा लाभ घेतलेला नाही.

५. आम्ही विद्यार्थी, पालक व जामीनदार मिळून अशी हमी देतो की, परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेताना ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मंजूर होईल तो अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी श्री / कुमारी ------------------------------------------------------ याची राहील. तथापी त्याने/तिने अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनामार्फत खर्च करण्यात

आलेली शिष्यवृत्तीची संपूर्ण वसूल पात्र रक्कमेस आम्ही जबाबदार राहू व ती रक्कम शासनास परत करण्याचे बंधन आमच्यावर राहील.

६. मी (विद्यार्थ्याचे नाव) ------------------------------------------------------------ --------अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पुढील तीन महिन्याच्या आत अंतिम परीक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्र संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करण्याची तसेच भारतात परत येऊन देशाची सेवा करणे व माझ्या ज्ञानाचा फायदा देशाला करुन देण्याचीही हमी देत आहे.

७. आम्ही याव्दारे कळवितो की, (विद्यार्थ्याचे नाव) ---------------------------------------- -------------------- यांच्या पालकांचे / कुटुंबाचे व (विद्यार्थी/विद्यार्थीनी नोकरी करीत असल्यास) श्री./ कुमारी ----------------------------------------(विद्यार्थ्यांचे नांव) याचे **सन २०२३-२४** या वर्षाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये सहा लाख पेक्षा जास्त नाही. तथापी सदरची माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास आम्ही कायदेशीर कारवाईस पात्र राहू.

८. अद्ययावत जागतीक क्रमवारीत असलेल्या ३०० च्या आतील (QS World Ranking मधील) परदेशातील विद्यापीठ/शिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी मी स्वत: प्रयत्न करेन व त्यासाठी आवश्यक त्या सर्व पात्रता परीक्षा स्वत: देईल.

९. पदव्युत्तर पदवी किंवा पी.एच.डी अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेला कालावधी किंवा सदर अभ्यासक्रम त्यापुर्वी पुर्ण झाल्यास जो कालावधी लागेल या दोघांपैकी जो कमी आहे त्या कालावधीपुरतेच परदेशात राहण्यास मला परवानगी असेल. या आवश्यक कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरीता परेदशात राहण्यास मला परवानगी मिळणार नाही हे मला मान्य आहे.

१०.शासनाकडून शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी परदेशातील शैक्षणिक संस्था/विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येकवेळी उत्तीर्ण होणे माझ्यावर बंधनकारक असून तसेच शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका व प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यांसाठी आयुक्तालयास सादर करणयात येईल.

११.प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificates), खर्चाच्या पावत्या (Receipts) इत्यादी विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांकडुन प्रमाणित करुन आयुक्तालयास सादर करण्यात येईल.

१२.मी वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला असून तो अभ्यासक्रम संपल्यानंतर व भारतात आल्यानंतर भारतीय आयुर्विज्ञान परिषद (Indian Medical Council) यांनी अनिवार्य केलेली परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास शासनाने मंजूर केलेली सर्व रक्कम विहीत कालावधीत परत

करण्याची हमी देत आहे. (फक्त वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या/घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही अट आहे. इतर अभ्यासक्रमासाठी नाही).

१३. मी शिक्षण पुर्ण केल्यानंतर मला जेव्हा नोकरी मिळेल, किंवा मी स्वत:चा व्यवसाय सुरु करेल किंवा अभ्यासक्रम पुर्ण केल्यापासून दोन वर्षानंतर यापैकी कमी असलेला कालावधीपासून माझ्या शिक्षणासाठी शासनामार्फत संपूर्ण अभ्यासक्रमासाठी जो खर्च करण्यात आला त्या खर्चाचा कमीत कमी १०% रक्कम मी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय निधीमध्ये जमा करेन.

१४. उपरोक्त नमूद केलेल्या सर्व बाबी मला मान्य असून त्या आम्ही वाचून व समजून घेऊन त्यावर आज दिनांक ------------------ रोजी मुक्कामी सही केली आहे. वरील बाबींपैकी कोणताही बाब खोटी व चुकीची/बनावट आढळल्यास मी भारतीय दंड संविधान कलम १९३ (२), १९९, २०० व ४०६ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

स्थळ :
दिनांक : / /२०२४.

| | | |
|---|---|---|
| **( सही** | **सही** | **सही** |
| **(विद्यार्थी) (फोटो)** | **(पालक) (फोटो)** | **(जामीनदार) (फोटो)** |
| **संपूर्ण नांव व पत्ता** | **संपूर्ण नांव व पत्ता** | **संपूर्ण नांव व पत्ता** |
| **दूरध्वनी क्र. / मो.क्रं.** | **दूरध्वनी क्र. / मो.क्रं.** | **दूरध्वनी क्र. / मो.क्रं.** |

(टिप- निवडीनंतर सादर करावयाचे आहे.)

(रु.५००/- च्या स्टॅम पेपर वर करणे)

**विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजनेसाठीचे**

**(सन २०२४-२५)**

**-हमी पत्र-**

१. मी ---------------------------------------------------------------- राहणार ---------
--------------------------------------------------------------------------------------------
-येथे राहत असून माझी महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन समाज कल्याण विभागामार्फत विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या च्या मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी **परदेशी** शिष्यवृत्ती योजना या योजने अंतर्गत परदेशातील (देशाचे नाव)------------------------ - येथे (विद्यापीठाचे नाव) ---------------------------------------- या विद्यापीठात (कालावधी)- ---------- वर्षाच्या (अभ्यासक्रमाचे नाव)---------------------------------------- या अभ्यासक्रमासाठी सन---------- या वर्षाकरिता परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. त्या अनुषंगाने मी संचालक इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय पुणे यांना खालीलप्रमाणे हमी देत आहे.

२. मी सद्यस्थितीत ------------------------------------------------- येथे नोकरीस असून सदर कार्यालयातील प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वत: प्रत्यक्षपणे निराकरीत करेल यासाठी कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून घेणार नाही. (नोकरी करणाऱ्यांसाठी लागू)

३. अर्जात नमुद केलेला अभ्यासक्रम विहीत कालावधीत पुर्ण करणे माझ्यावर बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी वाढीव कालावधीची मागणी करणार नाही.

४. मला शासनाने मंजूर केलेल्या परदेशातील विद्यापीठ व शैक्षणिक अभ्यासक्रमात मी परस्पर बदल करणार नाही.

५. अर्जासोबत सादर केलेले कागदपत्रे / प्रमाणपत्रे हे खोटे व बनावट असल्याचे आढळून आल्यास शिष्यवृत्ती पोटी मिळालेली सर्व रक्कम व्याजासह परत करण्याची हमी देत आहे.

६. कोणत्याही कारणास्तव अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनातर्फे मला अदा करण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम व्याजासह कुटूंबाच्या मालकीच्या / जामिनदार यांच्या स्थावर मालमत्तेमधून एक रकमी भरपाई करण्याची अथवा वसुल करण्याची हमी देत आहे.

७. परदेशामध्ये शिक्षण घेत असतांना काही कारणास्तव राज्य शासनाच्या पुर्व परवानगीने परदेशातून भारतात काही कालावधीसाठी वास्तव्य केले असेल तर सदर कालावधीची शिष्यवृत्तीची रक्कम मला अनुज्ञेय होणार नाही.

८. परदेश शिष्यवृत्ती अंतर्गत परदेशात शिक्षण घेत असताना जास्तीची रक्कम शासनातर्फे मला अदा झाली असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची परतफेड करेन. अथवा न केल्यास ती वसुल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाहीस मी पात्र असेन.

९. मला शिक्षण फी व इतर फी, निर्वाह भत्ता व आकस्मिक खर्च यासाठी शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही. निधारित दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च मी स्वत: अदा करेन.
१०. परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे माझ्यावर बंधनकारक असून तसे शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यांसाठी संचालनालयास सादर करेन.
११. कोणतेही कारण अथवा सबबी सांगून अभ्यासक्रम पूर्ण न करणे, विहीत प्रयोजनासाठी खर्च न करणे, खर्चात काटकसर न करणे, विहीत लाभ मर्यादेपेक्षा जास्तीची मागणी परदेशात जावून करणे, कोणत्याही प्रकारचा दबाव आणणे किंवा धमकी देणे, परदेश शिष्यवृत्ती नियमावलींतील तरतूदींचे उल्लंघन करणे, परदेशातील नियम / अटी /तरतूदींचे उल्लंघन करणे, वाममार्गास लागणे, परदेशातील शैक्षणीक कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करणे व त्यासाठी दंड शिक्षा होणे, भारतीय राष्ट्रीयत्त्वास हानी पोहचवणे, भारताची बदनामी करणे या बाबी कर्तव्यातील कसूर समजण्यात येतील. कर्तव्यात कसूर केल्यास मला अपात्र ठरवून माझ्या परदेशी शिक्षणासाठी शासनाने दिलेले सर्व लाभ माझ्याकडून व्याजासह वसूल केले जातील.
१२. परदेशातील अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर मी भारतात येवून माझ्या ज्ञानाचा उपयोग देशासाठी करेन.
१३. उपरोक्त नमूद केलेला सर्व मजकूर मला मान्य असून तो मी वाचून समजून घेऊन आज दिनांक- / /२०२४ रोजी----------- मुक्कामी सही केली असे, वरील बाबींचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास मी भारतीय दंड संविधान कलम १९३ (२), १९९, २०० व ४०६ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

स्थळ :

दिनांक : / /२०२४.

| | | |
|---|---|---|
| **सही** | **सही** | **सही** |
| **(विद्यार्थी) (फोटो)** | **(पालक) (फोटो)** | **(जामीनदार) (फोटो)** |
| **संपूर्ण नांव व पत्ता** | **संपूर्ण नांव व पत्ता** | **संपूर्ण नांव व पत्ता** |
| **दूरध्वनी क्र. / मो.क्रं.** | **दूरध्वनी क्र. / मो.क्रं.** | **दूरध्वनी क्र. / मो.क्रं.** |

## परदेश शिष्यवृत्ती योजनेसाठी विद्यार्थ्यांने अर्जासोबत सादर करण्यासाठी कागदपत्रांची चेक लिस्ट

| अ.क्र. | कागदपत्रे/प्रमाणपत्रे/सहपत्रे | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | विहीत नमुन्यातील Online भरलेला परिपूर्ण अर्ज | |
| २ | जातीचे प्रमाणपत्र | |
| ३ | जात पडताळणी प्रमाणपत्र | |
| ४ | नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र | |
| ५ | विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचा दाखला (Domicile Certificate) (छायांकित प्रत) | |
| ६ | विद्यार्थ्याचे आई/वडील अथवा आई, वडील हयात नसल्यास, आणि पालक असल्यास पालकांचा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचा दाखला (Domicile Certificate) (छायांकित प्रत) | |
| ७ | विद्यार्थ्यांच्या वयासंबंधीचे प्रमाणपत्र (शाळा सोडल्याचा दाखला/ Domicile / SSC प्रमाणपत्र) | |
| ८ | पदवी गुणपत्रिका/प्रमाणपत्र | |
| ९ | पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका/प्रमाणपत्र | |
| १० | GRE(छायांकित प्रत) | |
| ११ | TOFFEL/IELTS (छायांकित प्रत) | |
| १२ | विद्यार्थी नोकरी करीत असल्यास कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र | |
| १३ | विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचा फॉर्म नं.१६ | |
| १४ | विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचा Income Tax Return Form | |
| १५ | कुटुंबातील सर्व व्यक्तींचे सर्व मार्गांनी मिळून वर्ष २०२४-२५ करीताचा सक्षम अधिका-याने दिलेला उत्पन्नाचा दाखला | |
| १६ | परदेशातील विद्यापीठाचे मूळ विनाअट प्रवेशपत्र (Unconditional Offer Letter) | |
| १७ | परदेशातील विद्यापीठाचे अभ्यासक्रमाबाबत माहितीपुस्तिका | |
| १८ | परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे वार्षिक खचाचे अंदाजपत्रक (विद्यापीठाचे पत्र) | |
| १९ | आधार कार्ड/ | |
| २० | शिधापत्रीका (रेशन कार्ड) | |
| २१ | पासपोर्ट | |
| २२ | वडील हयात नसल्यास ,मृत्यूचा दाखला | |
| २३ | आई-वडिल विभक्त असल्यास , न्यायालयाचे संबंधित कागदपत्रे | |
| २४ | रु.५०० /- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र (निवडीनंतर) | |
| २५ | रु.५०० /- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र (निवडीनंतर) | |
| २६ | विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न भारतातील बँक खात्याची माहिती चेक बुक/पासबुक | |
| २७ | विद्यार्थ्यांचे स्वास्थ्य चांगले असल्याचे नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र | |
| २८ | QS World Ranking number list (University Number) | |